**खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५** **निशाणी क्र. १८५**

साक्षीदार क्र. १३

मी शपथपुर्वक सांगते की,

माझे नाव : भरत अर्जुन शिंदे,

वय : ७७ वर्ष,

व्यवसाय : सेवानिवृत्त,

पत्ता : ठाकुर्ली, जिल्हा. ठाणे.

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**

१. मी आरोपी प्रज्योत भागवत यास ओळखत नाही. प्रज्योत भागवत याचे नाव मी माझ्या मित्राचा मुलगा श्री. राहुल मारुती कोरपे याच्या तोंडून ऐकलेले आहे. राहुल व प्रज्योत हे दोघेही मित्र आहेत. मला राहुल कोरपे याने त स्वत: प्रज्योत भागवत याच्यासोबत शेअर मार्केटचा व्यवसाय करत असून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगितले होते.

२. मी साधारण सन २०२१ ते २०२४ या कालावधीत राहुल कोरपे यांच्याकडे एकदा रु. १,००,०००/— व दुस—यांदा रु. ५०,०००/— असे एकूण रु. १,५०,०००/— शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी दिले होते. सदरील रक्कम मी राहुल कोरपे यास रोख स्वरुपात दिली होती.

३. माझे स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा चोळेगाव, ठाकुर्ली पूर्व, जि. ठाणे येथे बचत खाते असून त्या खात्याचा क्रमांक ३४८९७२४८४३८ असा आहे. मी गुंतवलेल्या रक्कमेवर मला रु. १,१७,५००/— ऐवढा परतावा मिळाला होता. तो परतावा मला सदरील खात्यावर प्राप्त झालेला असून त्याच्या नोंदी खाते उता—यामध्ये उपलब्ध आहेत. ती रक्कम मला कोणाकडून प्राप्त झाली होती ते आज मला वय झाल्यामुळे आठवत नाही. परंतु, सदरील रक्कम ही राहुल कोरपे अथवा प्रज्योत भागवत यांच्याकडुन आली असावी.

<u>**उलटतपास आरोपीकरीता ॲड. कपिल वर्मा यांचेतर्फे :—**</u>

४. हे म्हणणे खरे आहे की, मी गुंतवणूकीची रक्कम ही प्रज्योत भागवत याला वैयक्तिकरित्या दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, राहुल कोरपे यांनी माझ्याकडून घेतलेली रक्कम कोठे गुंतवलेले होती याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात माझ्या वर नमुद बचत खात्याचा खाते उतारा न्यायालयात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरुन आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास संपला.**</u>

<u>**फेरतपासः—**</u>

५. काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०९/०६/२०२६.**